सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग
प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी
फोन नं. ०२३६२- २२९००५ ते २२९०१० ई मेल - sindhudurgdcc@gmail.com

जा.क्र.कर्ज/९९९/३२/विकास/ **२४५** / २०१४-१५ दि.३०/०४/२०१४

## -: परिपत्रक क्र. २ :-

**विषय :-** सेवकांच्या पगार तारणावर कर्ज पुरवठा करणेच्या धोरणात सुधारणा करुन एकत्रित धोरण तयार करणेबाबत.

पगारदार सेवकांना त्यांच्या आकस्मिक गरजा, औषधोपचार, घरगुतीकामासाठी, मुला - मुलींचे लग्न, शिक्षण आदिंकरिता पैशाची गरज भासते मात्र त्यांच्याकडे तारण ठेवणेसाठी बऱ्याचवेळा स्थावर मिळकत नसते. आणि स्थावर मिळकत असली तरी बँक धोरणानुसार त्यावर बँक कर्जाचा बोजा निर्माण करणे आदी कारणांसाठी बराच विलंब होतो. सेवकांच्या आर्थिक गरजा आपल्या बँकेने भागविण्यासाठी पगार तारण कर्जाची योजना 'सिंधु पगारतारण' कर्ज योजना या नावाने दि. १ जून २००५ पासून राबविण्यास सुरुवात केली. सदर योजना राबविताना आलेल्या अडीअडचणी विचारात घेवून, त्यामध्ये वेळीवेळी गरजेनुरुप बदल केलेले आहेत.

बँक कर्ज व्यवहाराचा आढावा घेता व शाखा व्यवस्थापक सभेमध्ये चर्चा करता या कर्जाच्या मर्यादेमध्ये वाढ केल्यास सुरक्षित कर्ज व्यवहारात वाढ होवू शकेल, अशी सूचना करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन मा. संचालक मंडळ सभा दि. २९.०४.२०१४ मधील निर्णयानुसार खालीलप्रमाणे सुधारणांसह एकत्रित धोरण कळविण्यात येत आहे. यापूर्वी वेळोवेळी कळविण्यात आलेली खालील संदर्भित परिपत्रके रद्द समजणेत यावीत.

***योजनेचे नांव :-*** सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेची पगारदार सेवकांसाठी **''सिंधु पगार तारण कर्ज योजना''** असे राहील.

***योजनेचा उद्देश :-*** जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय नोकरदार या योजनेत सहभागी होवू शकतील. ज्या कर्मचाऱ्यांचे पगार अन्य बँकांमार्फत वितरीत होतात. असे कर्मचारी कर्ज घेण्यास या योजनेस पात्र राहातील. अशा नोकरदांना त्यांच्या पगाराच्या तारणावर आकस्मिक व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी मध्यम मुदत स्वरुपाचे कर्ज या योजनेत देण्यात येईल.

***पात्रतेचे निकष :-***

०१. अर्जदार व जामिनदार हे सिंधुदुर्ग जिल्हयातील रहिवाशी असावेत व त्यानी बँकेचे 'ब' वर्ग सभासदत्व स्विकारले पाहिजे.

०२. शासनाने नियुक्त केलेले शिक्षण सेवक, अंगणवाडी सेविका, कृषीसेवक, आपल्या बँकेतील २९ दिवसांचे कर्मचारी आदी नोकरदारांनाही या योजनेचा लाभ घेता येईल. मात्र त्यांचे जामिनदार हे कायमसेवेतील नोकरदार असणे आवश्यक राहील.

०३. नोकरदार पतसंस्थांचे कर्मचारी, गटसचिव व शासनअंगीकृत कंपन्या उदा. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, विमा कंपन्या, एस.टी. महामंडळ, कोकण रेल्वे कर्मचारी, ग्रा.पं. नगरपालिका कर्मचारी, केंद्र व राज्य शासनाचे कायम कर्मचारी इ.

०४. जिल्हयाबाहेरील मूळ रहिवाशी असलेले मात्र सद्यस्थितीत जिल्हयात नोकरीत असलेले व ज्यांची बदली जिल्हयाबाहेर होवू शकते, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जामीनदार हे जिल्हयातील कायम रहिवाशी असलेले नोकरदार घेणेत यावेत. तसेच सदर जामीदारांकडून कर्जदाराकडून कर्ज रक्कम मुदतीत वसूल न झाल्यास त्यांचे पगारातून कर्ज हप्ता कपात करुन घेतली जाणार असल्याची स्पष्ट कल्पना देणेत यावी.

***कर्जकारण :-***

पगारदार सेवकांच्या दैनंदिन गरजा किंवा आकस्मिक गरजांसाठी मध्यम मुदत स्वरुपाचा खावटी कर्जपुरवठा.

*कर्ज मर्यादा :-*

| अ. क्र. | नोकरीचा प्रकार | कमाल कर्जमर्यादा |
|---|---|---|
| ०१ | सर्व शासकीय / निमशासकीय, बँक कर्मचारी, शासनअंगीकृत कंपन्या उदा. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, विमा कंपन्या, एस.टी. महामंडळ, कोकण रेल्वे कर्मचारी, ग्रा.पं. नगरपालिका कर्मचारी, सहकारी संस्थामधील संभाव्य वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळणारे कर्मचारी इ. | **एकूण मासिक पगार (मुळ पगार + महा. भत्ता + इतर भत्ते) च्या २५ पट अगर रु. ७.०० लाखापर्यंत यापैकी कमी असलेली मर्यादा.** |
| ०२ | बँके व्यतिरिक्त इतर सहकारी संस्थांमधील कायम सेवेतील कर्मचारी ज्यांचे पगार आपल्या बँकेमार्फत होतात व ज्यांना दरमहा किमान रु. ३,०००/- नक्त पगार हाती ठेवून (एकुण वेतनाच्या २५% किंवा रु. ३०००/- यापैकी जास्त असणारी रक्कम अर्जदाराच्या हाती राहणे आवश्यक आहे) उर्वरित रक्कमेतून कर्ज हप्ता वसूल झाला पाहिजे. | **एकुण मासिक पगार (मुळ पगार + महा. भत्ता + इतर भत्ते) च्या २५ पट अगर रु. १,००,०००/- पर्यंत यापैकी कमी असलेली मर्यादा.** |

(सद्याची कपात व संभाव्य हप्ता मिळून एकुण कपात पगाराच्या ७५% पेक्षा जास्त नसावी. उपरोक्त मर्यादेपेक्षा जास्त कर्ज मागणी असल्यास व ती पगारामध्ये बसत असल्यास जादा रु. ५.०० लाख पर्यंत कर्ज मंजूर करण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास राहतील.)

*कर्ज मंजूरी :-*

**०१. ज्या कर्जमागणीदारांचा पगार आपल्या बँकेत जमा होतो, अशा कर्ज मागणीदाराच्याबाबतीत रु. ७.०० लाख पर्यंत व अन्य बँकेत पगार जमा होणाऱ्या कर्ज मागणीदारांचेबाबतीत रु. ५.०० लाख पर्यंतचे कर्ज शाखा व्यवस्थापक आवश्यक ते दस्तऐवज घेवून तात्काळ मंजूर करतील.**

**०२. रु. ५.०० लाख मर्यादेवरील कर्जमागणी अर्ज शाखा व्यवस्थापकांनी शिफारस करुन प्रधान कार्यालयाकडे पाठविला पाहिजे. त्यांचे मंजूरीनंतर कर्ज वितरण करण्यात येईल.**

*मुदत :-*

कर्जदार यांची सेवानिवृत्तीची तारीख किंवा जास्तीत जास्त ८४ महिने (७ वर्षे) यापैकी कमी असणारा कालावधी मुदतीचे राहिल.

*व्याजदर :-*

सदर कर्जावर व्याजदर १४% राहील. सदर कर्जावर मासिक व्याज पध्दतीने व्याज आकारणी केली जाईल. कर्ज व्याजदरामध्ये वेळोवेळी बदल करणेचा अधिकार मा. संचालक मंडळास राहील.

**कर्ज वसुली :-**

१. कर्जाची वसुली मासिक पध्दतीने (EMI) दरमहा केली जाईल.

२. जर मासिक हप्ता वसूल झाला नाही तर पुढील महात वसुलपात्र हप्त्याच्या रकमेवर २ टक्के दंडव्याज आकारणी करुन तेवढी रक्कम कर्जखाती नांवे टाकून व्याज खाती जमा करावयाची आहे. प्रत्यक्षात तेवढी रक्कम कर्जदाराकडून स्वतंत्ररित्या वसुल करुन कर्जखाती जमा करुन घ्यावयाची आहे. या दंडव्याजाचा मासिक हप्त्याच्या रकमेमध्ये समावेश करुन मासिक हप्त्याच्या रकमेची वसुली करु नये.

३. एका हप्त्याची (EMI) आगावू रक्कम कर्ज उचलीवेळी जमा केली पाहिजे.

**मुदतपुर्व वसुली –**

०१. मुदतपूर्व अंशतः किंवा पूर्ण कर्जपरतफेड –

"सिंधु पगारतारण कर्ज योजनेंतर्गत" मासिक हप्ता (इ.एम.आय.) पध्दतीने कर्जवसुली केली जाते. अशा खात्यामध्ये आगाऊ रक्कम वसूल झाल्यास कर्जखात्याच्या उर्वरित मुदतीकरता बँकेला उत्पन्न मिळू शकत नाही. अशी कर्जखात्यांची अंशतः अगाऊ रक्कम वसुल झाल्यास अगर पूर्ण वसुली अगाऊ भरणा करुन खाती मुदतीपुर्वी बंद केल्यास भरणा दिनांकापासून अखेर मुदतीपर्यंतच्या कालावधीसाठी खालीलप्रमाणे ०.२५% मुदतपूर्व शुल्क (Prepaid charges) आकारणी करण्यात यावे.

अ) अंशतः कर्जवसुली (Part Payment) -

०१. इ.एम.आय. च्या पटीत कर्जवसुली करणे.

०२. जेवढे इ.एम.आय. जमा होतील तेवढया महिन्यांची संख्या काढावी व खालीलप्रमाणे आकारणी करावी.

सुत्र = भरणा रक्कम X ०.२५% /१२ X जेवढे हप्ते भरणार ती संख्या किंवा इ.एम.आय.ची संख्या.

ब) मुदतपुर्व पूर्ण रक्कम भरुन खाते पूर्णफेड करणे (A/c. closed before maturity) -

०१. ज्या महिन्यात पूर्णफेड करणार तो महिना सोडून पुढील महिन्यापासून अखेर मुदतीच्या महिन्यापर्यंत होणारे महीने काढावेत

सुत्र = येणेबाकी X ०.२५% / १२ x वरील मुद्दा (१) प्रमाणे होणारे महिने.

उदा. "सिंधु पगार तारण कर्ज योजने"अंतर्गत रु. ५०,०००/- कर्ज मंजूर झाले होते. सदर कर्जाचा कालावधी ८४ महिने होता व मासिक हप्ता रु. ८२५/- होता. तिन महिन्यानंतर खाते बंद करावयाचे झाल्यास त्या खात्यावर मुदतपुर्व शुल्क खालीलप्रमाणे आकारावे.

= रु. ४७५२५/- X ०.२५% / १२ Xx ८१ = रु. ८०२/-

क) मुदतपूर्व पूर्णफिड कर्जकालावधीच्या अर्धा किंवा अर्ध्यापिक्षा जास्त कालावधीनंतर केल्यास मुदतपूर्व शुल्क आकारण्यात येवू नये.

*उदा. वरील उदाहरणातील कर्जाची परतफेड ४२ महिन्यानंतर केल्यास मुदतपूर्व शुल्क घेण्यात येवू नये.*

सदरचे मुदतपूर्व शुल्क संबंधित कर्जखात्यास नांवे टाकून व्याज खाती जमा करावे व संबंधितांकडून त्याच दिवशी वसूल करुन कर्जखाती जमा करावयाचे आहे.

**तारण व्यवस्था :-**

पगारदार सेवकांचा पगार मुख्य तारण राहील. याव्यतिरिक्त नोकरीत कायम असलेले जामिनदार घेण्यात येतील. कर्जफेडीच्या मुदतीपर्यंत जामिनदार यांची सेवा शिल्लक असली पाहिजे. सदर कर्जदार व जामिनदारांनी बँकेचे 'ब' वर्ग सभासदत्व स्विकारले पाहिजे. तसेच त्यांच्या पगाराची कपात ७५% जास्त असू नये.

**जामिनदार :-**

**१) ज्या नोकरदारांचा पगार आपल्या बँकेत होतो अशा नोकरदारांकरीता रु. ५.०० लाख पर्यंतच्या कर्जासाठी एक जामीनदार घेणेत यावा. मात्र त्यावरील मर्यादेसाठी दोन जामीनदार घेणेत यावेत.**

**२) नोकरदारांचा पगार अन्य बँकेत होत असेल व चेकद्वारे दरमहा हप्ता वसूल होणार असेल तर रु. २.०० लाख पर्यंत कर्जासाठी एक जामीनदार घेणेत यावा. मात्र त्यावरील कर्जासाठी प्रचलित धोरणाप्रमाणे दोन जामीदार घेणेत यावेत.**

**इतर मुद्दे -**

०१. सदर कर्ज १००० चे पटीत मंजूर करणेत येईल.

०२. **रक्कम रु. ५,००,०००/- पर्यंतच्या कर्जासाठी नोकरदारांच्या पतसंस्थेच्या नाहरकत दाखल्याची आवश्यकता नाही.** मात्र त्यावरील रकमेच्या कर्जमंजूरीसाठी नोकरदार पतसंस्थेने "बँकेकडून कर्ज घेण्यास आपली हरकत नाही" असा उल्लेख असलेला दाखला कर्जमागणी अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच आपल्या बँकेकडून कर्ज घेवून नोकरदार पतसंस्थेचे कर्ज परतफेड करणार असल्यास त्यासाठी कर्ज मंजूर केले जाणार नाही व असा प्रस्ताव शाखा व्यवस्थापकांनी स्विकारु नये.

०३. पगारदार पतसंस्था सोडून अन्य वित्तीय संस्थांचे कर्ज असल्यास त्याची परतफेड करण्यासाठी कर्जमंजूर करता येईल. मात्र त्यासाठी संबंधित वित्तीय संस्थेचे अद्यावत येणेबाकी दाखला सादर करणे आवश्यक आहे.

०४. कर्जदाराने त्याच्या नोकरीची माहिती सेवानिवृत्तीची तारीख व मागील सहा महिन्यात मिळालेल्या अद्ययावत पगाराची माहिती बँकेच्या विहित नमुन्यांत त्यांचे व्यवस्थापन प्रमुख यांचे सही शिक्क्यानिशी सादर करावी. (कर्ज प्रस्ताव सादर करणाऱ्या महिन्याच्या मागील सहा महिन्याची पगार माहिती देण्यात यावी.)

०५. जर अर्जदार यांचा पगार आपल्या बँकेत होत असेल तर बँकेचे शाखेत त्यांचे सेव्हींग खाती जमा होणाऱ्या पगारातून दरमहा निर्धारीत केलेला कर्जाचा हप्ता ज्या तारखेस पगार जमा होईल त्या तारखेस प्रथम कर्ज हप्ता त्याचे सेव्हींग खाती नांवे टाकून कर्ज खाती जमा करणेचे संमतीपत्र बँकेस लिहून देणेचे आहे.

०६. जर अर्जदार यांचा पगार आपल्या बँकेत होत नसेल तर ज्या बँकेत पगार जमा होतो. त्या बँकेतील खात्यावरील कर्जाच्या मासिक हप्त्याच्या रकमेचे आगावू चेकचे किमान एक चेकबुक कर्जउचलीच्यावेळी सर्व चेकवर सही करुन दिले पाहिजे. सदर चेकबुक संपताच नविन चेकबुक देण्याची जबाबदारी कर्जदाराची राहील तसेच ते वेळीच घेण्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापक यांची राहील. अर्जदार यांनी कर्जहप्त्याची रक्कम रोख स्वरुपात भरण्याची मुभा राहील व त्याने रोख रक्कम भरल्यास चेकचा वापर करण्यात येवू नये **किंवा**

अर्जदार यांचा पगार ज्या बँकेतील खात्यावर जमा होतो त्या बँकेला अर्जदार यांनी कर्जापोटी होणाऱ्या मासिक हप्त्याची रक्कम दरमहा आपल्या खात्यावरुन आमच्या बँकेतील अर्जदाराच्या कर्जखाती जमा होण्यासंबंधीच्या स्थायी सूचना देवून, त्याची प्रत संबंधित बँकेच्या पोचीसह, सही शिक्क्यानिशी आमच्या बँकेच्या शाखा व्यवस्थापक यांना सादर केल्यानंतर कर्जउचल दिली जाईल. सदर स्थायी सूचनेबाबत शाखा व्यवस्थापक यांनी खात्री करावयाची आहे.

०७. जर पगार आदा करणाऱ्या कार्यालयाने बँकेच्या विहीत नमुन्यातील पत्रकानुसार दरमहाचा हप्ता कपात करुन देण्याचे हमीपत्र दिलेले असेल तर वरील मुद्दा क्र. ५ व ६ शिथील राहील. *नमुना डी.एफ. कंझ्यु. - २ सोबत जोडलेला आहे.*

०८. लाभार्थी व जामिनदार हे कोणत्याही संस्थेकडील अगर बँकेकडील कर्जाचे थकबाकीदार नसावेत व तसे प्रतिज्ञापत्र साध्या पेपरवर सोबतच्या नमुन्यात करुन दिले पाहिजे.

०९. अर्जदाराला रु. १००/- चे स्टॅम्पपेपरवर बँकेच्या छापील नमुन्यात अधिकारपत्र त्रिपक्षीय करारनामा करावा लागेल. ज्या ठिकाणी विहीत नमुन्यातील त्रिपक्षीय करार रु. १००/- च्या बॉण्डपेपरवर करुन दिला जात नाही. अशा ठिकाणी संबंधित अर्जदाराने रु. १००/- च्या बॉण्डपेपरवर महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४९ अंतर्गतचे करारपत्र मा. कार्यकारी दंडाधिकारी (तहसिलदार)/नोटरी यांचे समक्ष करुन दिले पाहिजे.

१०. संबंधीत कर्जदाराकडून आवश्यक दस्तऐवज घेवून कर्ज देणेत येईल. अधिकारपत्र, प्रॉमिसरी नोट, त्रिपक्षीय करार, कर्ज मंजूरी अटी मान्यतेबाबत पत्र इत्यादी दस्तऐवज घेणेत यावेत.

११. कर्जदार सभासद संबंधीत खात्याचे नोकरीमधून निलंबीत, बडतर्फ झाल्यास त्यांनी त्यांचेकडील देणे (मुद्दल + व्याज) असलेले कर्जाची सर्व रक्कम त्याला मिळणाऱ्या इतर रकमांमधून एक रकमी भरणा करणेची आहे. कर्ज परतफेड न झाल्यास सदर कर्जाच्या जामिनदारांकडूनही रक्कम वसूल करण्यात येईल.

१२. कर्जदाराचा, कर्ज कालावधीत मृत्यू झाल्यास त्यांचे पश्चात त्यांचे वारसांकडून किंवा लाभ मिळणाऱ्या व्यक्तीकडून कर्जाची वसुली केली जाईल. तसेच जामिनदार यांचेकडूनही कर्जाची वसूली केली जाईल.

१३. काही कारणासाठी सलग मासिक तीन हप्ते वसुल झाले नाही तर सदरचे कर्ज थकीत झाले असे समजून जामिनदार यांच्या वेतनातून कर्जहप्ता व व्याज वसूल केले जाईल. जामिनदार यांच्या पगारातून वसूल करावयाची कार्यवाही शाखा व्यवस्थापक यांनी करावयाची आहे. त्यासाठी पुनःश्च प्रधान कार्यालयाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

१४. सदर योजनेचा लाभ या बँकेचे सेवकही घेवू शकतील. त्यांना चार्टड ऑफ डिमांडनुसार मंजूर असलेला व्याजदर व नियम लागू राहतील.

१५. या योजनेखाली मंजूर कर्जाची उचल एकरकमी दिली जाईल व पुढील महाच्या पगारातून कर्जवसुलीस सुरुवात होईल.

१६. या योजनेतून घेतलेले कर्ज पूर्णफेड झाल्यानंतरच नविन कर्जाची उचल दिली जाईल.

१७. एखाद्या कर्जदाराची बदली अन्य ठिकाणी झाल्यास बदलीच्या ठिकाणी असलेल्या शाखेकडे कर्ज डॉक्युमेंट तात्काळ वर्ग करणे आवश्यक आहे.

१८. प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत मुख्याध्यापकाने दिलेला पगाराचा दाखला ग्राह्य धरण्यात येईल.

१९. सदरचे कर्ज M. T. LOAN TO SALARY EARNERS(INDL.) [19817] या हेड खाली दर्शविण्यात यावे.

सदर परिपत्रकाची प्रत सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून सदर धोरणाची दि. १.०५.२०१४ पासून प्रभाविपणे अंमलबजावणी करणेत यावी.